MHAH230005162019

**नियमीत दिवाणी दावा क्रमांक २१४/२०१९ मधील**

**निशाणी क्र.६३ वरील आदेश**

अर्जदारातर्फे दाखल अर्ज वाचला. त्यावर प्रतिवादींतर्फे दाखल म्हणण्याचे अवलोकन केले. प्रतिवादींच्या व अर्जदारांच्या विद्ववान वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

०२. वादीचे असे कथन आहे की, प्रस्तुत दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. २३ शिवाजी गुलाब आढाव हे दि.०७/०२/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. प्रतिवादी क्र. २३ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी आवश्यक असलेली महत्वाची कागदपत्रे व योग्य ती माहिती वादीला वेळेत उपलब्ध झाली नाही. त्यामुळे वादीस प्रतिवादी क्र. २३ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी विलंब झालेला आहे. परिणामी, प्रतिवादी क्र. २३ विरुध्द दावा उपशमित झालेला आहे. दावा स्थावर मिळकतीशी संबंधीत असल्याने दावा उपशमित झाल्याचा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास त्यांचे अतोनात नुकसान होईल. त्यामुळे वादीने दावा उपशमित झाल्याचा आदेश रदद करण्याची विनंती केलेली आहे.

०३. प्रतिवादींनी अर्जाच्या पाठीमागील पानावर आपले म्हणणे दाखल करुन अर्जावर योग्य तो आदेश पारीत करावा अशी विनंती केलेली आहे. तसेच, मयत प्रतिवादी क्र. २३ यांच्या वारसांना नोटीस बजावणी होऊन देखील ते अर्जाच्या कामी हजर न राहिल्याने प्रस्तुत अर्ज त्याच्याविरुध्द एकतर्फा चालविण्यात आला.

०४. प्रतिवादी क्र. २३ शिवाजी गुलाब आढाव हे दि.०७/०२/२०२४ रोजी मयत झाले असल्याचे निशाणीय क्र. ७१ वरील मृत्युप्रमाणपत्रावरुन दिसुन येते. तद्नंतर विहीत वेळेत मयत प्रतिवादी क्र. २३ यांच्या वारसांना प्रकरणात हजर होणे आवश्यक होते. परंतु, तसे न झाल्यामुळे प्रतिवादी क्र. २३ विरुध्द दावा उपशमित झालेला आहे. प्रकरण जाहिर ठराव व वाटप होऊन मिळणेबाबत दाखल करण्यात आलेले आहे. मयत प्रतिवादी क्र. २३ यांच्या वारसांना दावा पुढे चालु ठेवण्याचा अधिकार आहे. वादीने अर्जात नमुद

केलेली कारणे व मयत प्रतिवादी क्र. २३ याच्या मृत्युची तारीख विचारात घेता, दावा उपशमित झाल्याचा आदेश रदद करणे दावा गुणदोषावर निकाली काढण्यासाठी आवश्यक आहे. परंतु, वादीला झालेला विलंब व त्यामुळे प्रस्तुतचे प्रकरण पुढे चालण्यासाठी झालेली दिरंगाई नजरेआड करता येणार नाही. वादी यांना सदरचा विलंब खर्चाची रक्कम देऊन पैशात भरुन काढता येण्याजोगा आहे. सबब, अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो. त्यामुळे न्यायाचा हेतु साध्य करण्यासाठी मी पुढील आदेश पारीत करतो.

**<u>आदेश</u>**

**(१)** अर्ज रक्कम रुपये १००/- इतक्या खर्चावर मंजुर करण्यात येत आहे.

**(२)** मयत प्रतिवादी क्र. २३ विरुध्द दावा उपशमित झाल्याचा आदेश रदद करण्यात येतो.

**(३)** वादी यांनी पुढील तारखेपावेतो खर्चाची रक्कम रुपये १००/- विधी सेवा समितीकडे देण्यात यावी.

**(४)** प्रस्तुतच्या अर्जाचा खर्च वादी यांनी सोसावा.

PATIL PRAVIN VISHWAS

Digitally signed by PATIL PRAVIN VISHWAS
Date: 2026.01.23 18:02:33 +0530

(प्रविण वि. पाटील)

दिनांकः– २३–०१–२०२६.

सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
श्रीगोंदा.

**-: <u>प्र मा ण प त्र</u> :-**

प्रमाणीत करण्यात येते की, या पी. डी. एफ. फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ आदेशाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | एन.डी.दावत (श्रेणी-३) |
| न्यायालयाचे नांव | : | सह दिवाणी न्यायाधीश तथा<br>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीगोंदा,<br>ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर. |
| आदेश घोषित केल्याचा दिनांक | : | २३-०१-२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केल्याचा दिनांक | : | २३-०१-२०२६ |
| आदेश अपलोड दिनांक | : | २३-०१-२०२६ |